Ref. : JCIL/BSE/2026
Date : September 18, 2026

To
The Secretary,
BSE Limited
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai – 400 001

**Scrip Code: 500147**

**Sub.: Intimation under Regulation 30 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015- Newspapers advertisement for transfer of shares to the Investor Education and Protection Fund Authority.**

Dear Sir/Madam

Pursuant to Regulation 30 read with Para A of Part A of Schedule III of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements), Regulations 2015, as amended from time to time, please find enclosed herewith a copy of newspaper advertisements notice, published in (1) Business Standard (English Newspaper) and (2) Sakal (Marathi Newspaper) on September 18, 2026 in compliance with Section 124 of the Companies Act, 2013 read with the Investor Education and Protection Fund Authority (Accounting, Audit, Transfer and Refund) Rules, 2016 as amended from time to time.

Kindly take the same on your record

Thanking you,
Yours faithfully,
**For John Cockerill India Limited**

Nidhi Narayan Salampuria
Digitally signed by Nidhi Narayan Salampuria
Date: 2026.09.18 12:18:47 +05'30'

**Nidhi Salampuria**
**Company Secretary & Compliance Officer**
**(FCS: 10448)**

Encl.: As above

# Navigate the market's twists and turns

Take a deep dive into a stock or sector with Compass in Business Standard, and gain insights into the trends, triggers, and shifts that could shape market movements ahead.



Business Standard

Insight Out

To book your copy, SMS **reachbs** to **57575** or email **order@bsmail.in**

businessstandard bsindia business.standard business-standard.com


## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that the share certificate(s) for the under mentioned equity shares of Grasim Industries Limited has/have been lost / misplaced/stolen and I/we are applying to the Company for issue duplicate share certificate(s).

Any person(s) who has/have a claim in respect of the said equity shares should lodge the same with the Company at its Corporate Office at Grasim Industries Limited, Aditya Birla Centre, 'A' Wing, 2nd Floor, S. K. Ahire Marg, Worli, Mumbai - 400 030, Maharashtra within 15 days from this date, else the Company will proceed to issue duplicate certificate(s) to the aforesaid holder/claimant without any further intimation and no further claim would be entertained from any person(s).

| Folio No. | Name of the Shareholder(s) | No. of Shares | Certificate No. | Distinctive No. | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | From | To |
| M09011 | SH. Maturam Sharma | 1875 | 3134901 | 452395241 | 452397115 |

Place: Mumbai
Date: 18-09-2026

Name of the shareholder(s)
Pawan Kumar Sharma

## John Cockerill India Limited

Registered office:- Unit No.1902, 19th Floor, Aurum Q2 IT Parc,TTC Industrial Area, Thane Belapur Road, Navi Mumbai – 400 710 | Tel.: +91 9619762727,
Email: investors.jcil@johncockerill.com
Website: www.johncockerillindia.com,
CIN.:L99999MH1986PLC039921

### NOTICE

### TRANSFER OF SHARES OF THE COMPANY TO INVESTOR EDUCATION AND PROTECTION FUND

This Notice is published pursuant to the provisions of Section 124 of the Companies Act, 2013 ('the Act') read with the Investor Education and Protection Fund Authority (Accounting, Audit, Transfer and Refund) Rules, 2016 as amended up to date (hereinafter referred to as "the Rules")

The said Act and the Rules, amongst other matters, contain provisions for transfer of all shares in respect of which the beneficial owner has not encashed any dividend warrant during last seven years to the DEMAT Account of the Investor Education and Protection Fund Authority("IEPF").

Accordingly, the Company has already sent a specific communication to the concerned shareholders whose shares are liable to be transferred to DEMAT Account of IEPF at their latest available address with the Company under the said Rules for taking appropriate action(s).

The Company has uploaded Full details of such shareholders and shares due for transfer to DEMAT Account of IEPF on its website **https://johncockerillindia.com**. Shareholders are requested to visit the website of the Company to verify the details of un-encashed dividends and the shares liable to be transferred to DEMAT Account of IEPF.

Notice is hereby given that pursuant to Section 124(6) of the Companies Act, 2013 read with the Rules, the Company would be transferring all shares in respect of which the beneficial owner has not encashed any dividend warrant during last seven years (i.e. FY 2018-19 and onwards) to the DEMAT Account of IEPF.

The shareholders holding such shares in physical form which stand registered in their name will stand automatically cancelled and be deemed non-negotiable. The shareholders may further note that the details uploaded by the company on its website should be regarded and shall be deemed adequate notice in respect of issue of duplicate share certificate(s) by the Company for the purpose of transfer of shares to DEMAT Account of IEPF pursuant to the said Rules. In respect of shares held in Demat Form necessary corporate action shall be initiated by the Company for transfer of shares to DEMAT Account of IEPF as per the Rules.

The concerned shareholders may note that, upon such transfer, they can claim the said shares along with dividend(s) from IEPF for which a separate application has to be made to the IEPF in Form IEPF-5, as prescribed under the Rules and the same is available at IEPF website i.e. **www.iepf.gov.in**

In case the Company does not receive any communication from the concerned shareholders by September 25, 2026, or such other extended date, the Company shall, with a view to complying with the requirements set out in the Rules, transfer the shares to the DEMAT Account of IEPF by the due date as per procedure stipulated in the Rules.

For any queries on the above matter, the concerned shareholders are requested to contact the Company or Bigshare Services Private Limited, Registrar and Share Transfer Agents at Office No. S6-2, 6th Floor, Pinnacle Business Park, Next to Ahura Centre, Mahakali Caves Road, Andheri East, Mumbai – 400093, Maharashtra, India | Tel No.: +91 22 62638200 / 62638300 | Fax No.: +91 22 62638299 | Email: **investor@bigshare online.com** | Website: **www.bigshareonline.com**

A copy of the Notice is available on the website of the Company at **https://johncockerillindia.com** and also available on the website of BSE Limited.

By order of the Board
**For John Cockerill India Limited**
**Sd/-**
**Nidhi Salampuria**
**Company Secretary**
**FCS:10448**

**Date: September 17, 2026**
**Place: Navi Mumbai**

## KALYANI STEELS LIMITED

CIN : L27104MH1973PLC016350
Regd. Office : Mundhwa, Pune - 411 036, Maharashtra, India
Tel No. : +91-20-66215000
Website : www.kalyanisteels.com Email : investor@kalyanisteels.com

### NOTICE OF POSTAL BALLOT

NOTICE is hereby given that pursuant to the provisions of Section 110 read with Section 108 and other applicable provisions, if any, of the Companies Act, 2013 ("the Act"), read together with Rules 20 and 22 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 ("the Rules"), (including any statutory modification(s) or re-enactment thereof for the time being in force) and any other applicable provisions of the Act and the Rules made thereunder, read with the General Circular Nos. 14/2020 dated April 8, 2020 and 17/2020 dated April 13, 2020, followed by General Circular No. 20/2020 dated May 5, 2020 and subsequent Circulars issued in this regard, the latest being 03/2025 dated September 22, 2025 issued by the Ministry of Corporate Affairs (collectively referred to as "MCA Circulars") and Regulation 44 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations") and other applicable provisions, if any, of the Listing Regulations, for the time being in force read along with SEBI Master Circular No.HO/49/14/14(7)2025-CFD-POD2/I/3762/2026 dated January 30, 2026 ("SEBI Master Circular") and the Secretarial Standard on General Meetings issued by the Institute of Company Secretaries of India ("SS-2"), the approval of the members of the Company is sought for the resolution set-out below, which is proposed to be passed by way of Postal Ballot by voting through electronic means only ("e-Voting").

| Description of Proposed Resolution | Type of Resolution |
|---|---|
| Appointment of Mr.Ajay Kirtane (DIN 02711040 and IDDB Registration No. IDDB-DI-202609-100882) as an Independent Director of the Company | Special Resolution |

Pursuant to MCA Circulars, the Postal Ballot Notice accompanied by the explanatory statement has been dispatched on Thursday, September 17, 2026 through electronic mode to those members whose e-mail addresses are registered with the Company / Depository Participants as on Friday, September 11, 2026 ("Cut-off date").

The Postal Ballot Notice is available on the website of :

1. The Company at www.kalyanisteels.com
2. BSE Limited ("BSE") at www.bseindia.com and National Stock Exchange of India Limited at www.nseindia.com where the Equity Shares of the Company are listed; and
3. National Securities Depository Limited ("NSDL") at www.evoting.nsdl.com

The Company has engaged the services of NSDL to provide e-Voting facility to its members. **The e-Voting commences on Saturday, September 19, 2026 at 9.00 a.m. (I.S.T.) and ends on Sunday, October 18, 2026 at 5.00 p.m. (I.S.T.)**. The e-Voting facility will be disabled thereafter. The voting rights of members shall be in proportion to their share in the paid-up equity share capital of the Company as on the Cut-off Date. Only those members whose names are recorded in the Register of Members of the Company or in the Register of Beneficial Owners by the Depository Participant(s) as on Cut-off Date will be entitled to cast their votes by e-Voting. A person who is not a member as on Cut-off Date should treat this Postal Ballot Notice for information purpose only.

The Board of Directors of the Company has appointed Mr. Sridhar Mudaliar (Membership No. FCS 6156 COP 2664), or failing him, Mrs. Meenakshi Deshmukh (Membership No. FCS 7364 COP 7893), Partners of M/s. SVD & Associates, Company Secretaries, Pune as the 'Scrutinizer', to scrutinize the e-Voting process in a fair and transparent manner.

In case of queries or issues regarding e-Voting, members may refer to the Frequently Asked Questions (FAQ's) for members and e-voting user manual for members at the Downloads Section of http://www.evoting.nsdl.com or may contact Mr.Umesh Sharma of MUFG Intime India Private Limited, Registrar and Transfer Agent of the Company, at umesh.sharma@in.mpms.mufg.com or call on 020-2616 1629 / 2616 0084.

The result of Postal Ballot will be announced on or before Wednesday, October 21, 2026 and shall be intimated to BSE and NSE. The result would also be uploaded on the website of the Company at www.kalyanisteels.com and also on the website of NSDL at www.evoting.nsdl.com

For Kalyani Steels Limited
Mrs. Deepti R. Puranik
Company Secretary

Place : Pune
Date : September 17, 2026

# महागाईच्या धास्तीने व्याजदरात वाढ

## अमेरिकेत 'फेडरल रिझर्व्ह'चा तीन वर्षांत पहिल्यांदाच निर्णय

वॉशिंग्टन, ता. १७ (पीटीआय) : अमेरिकेतील महागाईचा वेग अद्याप नियंत्रणात न आल्याने अमेरिकेच्या 'फेडरल रिझर्व्ह'ने बुधवारी (ता. १६) तीन वर्षांहून अधिक काळानंतर प्रथमच व्याजदरात पाव टक्क्याने वाढ केली. 'फेडरल ओपन मार्केट कमिटी'ने एकमताने घेतलेल्या निर्णयानुसार व्याजदर आता ३.७५ ते ४ टक्क्यांदरम्यान राहणार आहे. महागाईचे प्रमाण कायम राहिल्यास आणखी दरवाढीची शक्यता वर्तविण्यात येत आहेत.

अमेरिकेतील ग्राहकांसाठी अन्न, इंधन आणि निवासाच्या वाढत्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर 'फेडरल रिझर्व्ह'ने हा निर्णय घेतला आहे. ऑगस्टमध्ये अमेरिकेचा ग्राहक किंमत निर्देशांक मासिक पातळीवर ०.४ टक्क्यांनी, तर वार्षिक पातळीवर ३.४ टक्क्यांनी वाढला. पेट्रोलच्या किमतीत ऑगस्टमध्ये तब्बल ३.९ टक्क्यांची वाढ झाली आणि एकूण महागाईतील मासिक वाढीपैकी एक तृतीयांशपेक्षा अधिक वाटा पेट्रोलचा होता.

'फेडरल'चे दीर्घकालीन महागाईचे लक्ष्य दोन टक्के आहे. मात्र, सध्याची महागाई त्यापेक्षा बरीच वर आहे. त्यामुळे व्याजदर कमी करून आर्थिक हालचालींना चालना देण्याऐवजी महागाईचा वेग आटोक्यात आणण्याला प्राधान्य देण्याचा पवित्रा 'फेड'ने घेतला आहे. ताज्या अंदाजानुसार, यंदा आणखी एक दरवाढ होण्याची शक्यता कायम आहे. त्यामुळे अमेरिकेतील कर्जदार, कंपन्या आणि गुंतवणूकदारांसाठी आगामी काही महिने महत्त्वाचे ठरणार आहेत.



### ट्रम्प विरुद्ध फेडरल रिझर्व्ह

'फेडरल रिझर्व्ह'च्या निर्णयानंतर अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्याजदर वाढीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. अमेरिकेतील व्याजदर एक टक्का किंवा त्यापेक्षा कमी असायला हवेत, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. ट्रम्प यांनी नियुक्त केलेले 'फेडरल'चे अध्यक्ष केविन वॉर्श यांनी मात्र महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी संस्थेच्या स्वतंत्र निर्णयप्रक्रियेवर भर दिला आहे. त्यामुळे ट्रम्प सरकार आणि अमेरिकेची मध्यवर्ती बँक यांच्यातील मतभेद चर्चेत आले आहेत.

## रुपया तीन पैशांच्या घसरणीसह ९५.९४ वर

मुंबई, ता. १७ : दिवसभरातील व्यवहारादरम्यान ९६ ची पातळी ओलांडून खाली गेलेला रुपया, रिझर्व्ह बँकेच्या हस्तक्षेपामुळे दिवसअखेर सावरला आणि अमेरिकी डॉलरच्या तुलनेत केवळ तीन पैशांची घसरण नोंदवत ९५.९४ वर बंद झाला. आंतरबँक परकी चलन बाजारात, रुपया ९५.८८ वर उघडला आणि दिवसाच्या व्यवहारात ९६.१० या नीचांकी पातळीवर पोहोचला.

# 'फेड'च्या निर्णयाने बाजारात संमिश्र कल

मुंबई, ता. १७ : कच्च्या तेलाच्या भावात आज किंचित घसरण झाल्यामुळे तसेच अमेरिकी फेडरल बँकेने व्याजदरवाढ केल्यामुळे भारतीय शेअर बाजारांनी संमिश्र प्रतिक्रिया दिली. 'सेन्सेक्स' २१.८६ अंशांनी घसरला, तर 'निफ्टी' ५३ अंशांनी वाढला.

निर्देशांकांची आज दुसरी तेजी होती. आज 'सेन्सेक्स' दिवसभर ७४ हजारांच्या घरातच फिरत होता. आज औषधनिर्मिती, आरोग्य सेवा आणि बांधकाम व्यवसाय क्षेत्र दीड टक्का वाढली. प्रसार माध्यमांचे क्षेत्र सव्वा टक्का, तर वाहननिर्मिती आणि धातूनिर्मिती निर्देशांक एक टक्क्यापेक्षा जास्त वाढले. तर खासगी आणि सरकारी बँका ऑइल अँड गॅस यांचे निर्देशांक घसरले. मिड कॅप आणि स्मॉल कॅप निर्देशांक वाढले. दिवसअखेर 'सेन्सेक्स' ७४,३१४.५९ अंशांवर, तर 'निफ्टी' २३,२७०.६० अंशावर स्थिरावला. आज २४८० शेअरचे भाव वाढले, तर १४८७ शेअरचे भाव कमी झाले. 'सेन्सेक्स'मध्ये टाटा स्टील, इंडिगो, एटर्नल, बीईएल यांचे भाव दोन टक्क्यांपेक्षा जास्त वाढले.




## नवी मुंबई महानगरपालिका

### -: जाहीर प्रकटन:-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ (अ) अन्वये प्रभाग समित्यामध्ये बिनसरकारी संघटना व समाजलक्षी संघटना यांचे प्रतिनिधी नेमणूक करणेची तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र शासनाकडील राजपत्र शनिवार दिनांक १ जुलै २००० अन्वये नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचनेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती (प्रभाग समित्यामध्ये बिनसरकारी संघटना आणि समाजलक्षी संघटना याचे प्रतिनिधी घेण्यासाठी निकष) नियम २००० राज्यात लागू केले आहेत. सदरचे नियमातील नियम ३ नुसार तरतुदीस अनुसरून नवी मुंबई महानगरपालिका प्रभाग समित्यांमध्ये बिनसरकारी संघटना आणि समाजलक्षी संघटना याचे प्रतिनिधी घेण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. (अर्ज वाटप, स्वीकृत, वैध/ अवैध यादी, हरकती इ. कामकाज कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून जाहीर करणेत येत आहे.)

**पोटनियम ३ नुसार बिनसरकारी संघटना व समाजलक्षी संघटना यांना अधिनियमातील तरतुदीनुसार मान्यता देण्याचे निकषः-** संबंधित अधिनियमातील तरतुदीअंतर्गत प्रभाग समित्यांमध्ये सदस्य नामनिर्देशित करण्याच्या योजनांसाठी संघटनांच्या मान्यतेसाठी निकष पुढीलप्रमाणे असतील.

अ. उक्त संघटना मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५०(१९५० चा मुंबई एकोणतीस) किंवा सोसायटीज नोंदणी अधिनियम, १८६०, (१८६० चा एकवीस) याखाली नोंदणीकृत असाव्यात.
ब. उक्त संघटनांनी सदस्यांचे नामनिर्देशनाच्या दिनांकाआधीच्या तीन वर्षाचे लेखा परीक्षण झालेले लेखा विवरणपत्र आणि कामाचा अहवाल धर्मदाय आयुक्तांकडे सादर केलेला असावा.
क. उक्त संघटनांनी भारतीय संविधानातील अनुसूची १२ मध्ये नगरपालिकांची जी कामे दर्शविली आहेत, त्यांच्याशी संबंधित कमीतकमी १ प्रकल्प सदस्यांचे नामनिर्देशनाच्या आधीच्या तीन वर्षात पूर्ण केलेला असावा.

**पोटनियम ४ नुसार प्रभाग समितीचा सदस्य नामनिर्देशित करण्यासाठी अर्हताः-**

"नियम ४ नुसार उक्त संघटनांचा असा कोणताही सदस्य की जो कोणत्याही राजकीय पक्षाचा पदाधिकारी नाही किंवा केंद्र शासन, राज्य शासन, कोणतीही महानगरपालिका किंवा नगरपरिषदा यांच्या सेवेत नाहीत. अशी व्यक्ती प्रभाग समिती सदस्य म्हणून नामनिर्देशित होण्यासाठी पात्र असेल."

"महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९ (अ) (२) मधील (क) मध्ये निर्देशिलेल्या पालिका सदस्यांनी प्रभाग समितीच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या समाजकल्याणाच्या कार्यात गुंतलेल्या अशा मान्यता प्राप्त स्वयंसेवी संघटना व समाजसेवी संघटना यांच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले तीनपेक्षा अधिक नसेल इतक्या संख्येतील इतर सदस्य"

परंतु, अशा व्यक्तीची प्रभाग समितीच्या अधिकारितेतील प्रभागातील मतदार म्हणून नोंदणी झालेली असेल.

**नामनिर्देशन करण्याची पद्धतः-**

"नियम ५ नुसार प्रभाग समित्यांमध्ये सदस्य म्हणून नामनिर्देशनासाठी संस्थेचा सभासद हा त्यांच्या संस्थेमार्फत संबंधित प्रभागाच्या सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करील. सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी सर्व अर्जांची नियम ३ व ४ मधील तरतुदींच्या अनुषंगाने छाननी करून, सर्व अर्ज त्यांच्या पात्रतेबाबतच्या आपल्या अभिप्रायासह प्रभाग समित्यांमधील **निर्वाचित नगरसेवकांपुढे हे अर्ज ठेवतील आणि त्यानंतर निर्वाचित नगरसेवक सदर अर्जदारांमधून प्रभाग समित्यांचे सदस्य नामनिर्देशित करतील.** जर प्रभाग समित्यांवर सदस्याचे नामनिर्देशन करण्याबाबत एकमत होऊ शकले नाही तर निर्वाचित नगरसेवक त्यांची निवड बहुमताने करतील."

उक्त संघटनांच्या सदस्यांना प्रभाग समित्यांमध्ये प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी संबंधित सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्याकडे पुढील पत्त्यावर अर्ज करावेत अशी संघटनांना विनंती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | प्रभाग कार्यालयाचे नांव व स्थळ | प्रभागांतर्गत येणारे निवडणूक प्रभाग क्रमांक |
|---|---|---|
| १ | "अ" प्रभाग समिती, अे विभाग कार्यालय, बेलापूर भवन, से.११, बेलापूर, नवी मुंबई. | २५, २६, २७, २८ (एकूण ०४) |
| २ | "ब" प्रभाग समिती, बी विभाग कार्यालय, प्लॉट नं. पी-८ व पी-९ से.१४, कुकशेत, नेरूळ, नवी मुंबई. | २१, २२, २३, २४ (एकूण ०४) |
| ३ | "क" प्रभाग समिती, सी विभाग कार्यालय, बहुउद्देशीय इमारत ६ वा मजला, से.१६ ए. वाशी, नवी मुंबई. | १८, १९, २० (एकूण ०३) |
| ४ | "ड" प्रभाग समिती, डी विभाग कार्यालय, अण्णाभाऊ साठे, समाजमंदिर, से. १०, सानपाडा, नवी मुंबई. | १५, १६, १७ (एकूण ०३) |
| ५ | "ई" प्रभाग समिती, ई विभाग कार्यालय, परिमंडळ-२ विभाग, १ ला मजला, प्लॉट नं.२४/२५. से.६. कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०६. | ९, १०, ११, १२, १३ (एकूण ०५) |
| ६ | "एफ" प्रभाग समिती, एफ विभाग कार्यालय, घणसोली, घणसोली गांव, नवी मुंबई ४०० ७०१. | ५, ७, ८ (एकूण ०३) |
| ७ | "जी" प्रभाग समिती, जी विभाग कार्यालय, ऐरोली, से.३, ऐरोली, नवी मुंबई ४०० ७०८ | २, ३, ४ (एकूण ०३) |
| ८ | "एच" प्रभाग समिती, एच विभाग कार्यालय, ओ.एस.१ भूखंड, साठे नगरजवळ एम.आय.डी.सी., सेंट्रल रोड, दिघा, नवी मुंबई ४०० ७०८. | १, ६, १४ (एकूण ०३) |

**: नामनिर्देशित सदस्य निवड करण्याचा नामनिर्देशन कार्यक्रम :**

| अ. क्र. | निवड करण्याचा कार्यवाहीचा तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | नामनिर्देशन पत्र देणे | दि. २१/०९/२०२६ ते दि. ३०/०९/२०२६ (साप्ता. सुट्टी दि. २६, २७ सप्टेंबर व सार्व. सुट्टी दि. २५ सप्टेंबर २०२६ वगळून) | सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| २. | नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याचा कालावधी | | |
| ३. | नामनिर्देशन पत्र छाननी | दि. ०१/१०/२०२६ | सकाळी ११ वा. पासून |
| ४. | वैध नामनिर्देशन पत्राची यादी जाहीर करणे | दि. ०१/१०/२०२६ | अर्जाची छाननी प्रक्रिया संपल्यानंतर |

१. अर्जाचे नमुने (नॉमिनेशन फॉर्म) वर नमूद केलेल्या त्या त्या प्रभाग कार्यालयाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्या कार्यालयात मिळतील.
२. प्रभाग समितीमध्ये प्रतिनिधित्व मिळण्यासाठीचे अर्ज अचूक भरून व आवश्यक त्या कागदपत्रांसह (नॉमिनेशन फॉर्म) संबंधित विभागाच्या सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांचेकडे विहित वेळेत पोहोचतील अशा रीतीने समक्ष देणे आवश्यक राहील. विहित मुदतीत अर्ज न आल्यास सदरचा अर्ज बाद होईल.
३. पोस्टाने पाठविलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
४. अर्ज छाननीच्या वेळी अपूर्ण अर्ज, अर्जासोबत सादर केलेली अपूर्ण कागदपत्रे, अपूर्ण माहिती असलेले अर्ज, प्रमाणित न केलेले तसेच विभाग कार्यालय कार्यक्षेत्राबाहेरील संस्थांचे अर्ज बाद करण्याचे अधिकार सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांचे राहतील. काही वाद निर्माण झाल्यास महापालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.
५. अर्जाची छाननी सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्या मार्फत करण्यात येईल.
६. वैध व अवैध नामनिर्देशन पत्रांची यादी अवैधतेच्या कारणांसह संबंधित विभाग कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करणेत येईल.

**अर्जासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे.**

१. संघटना / संस्थेच्या नोंदणी प्रमाण पत्राची सत्यप्रत.
२. सर्वानुमते / बहुमताने निवडण्यात आलेल्या प्रतिनिधींचे नावाबाबत आवश्यक तो बैठकीचा वृत्तांत / ठरावाची साक्षांकित प्रत.
३. धर्मदाय आयुक्तांकडे सादर केलेल्या लेखापरीक्षण अहवालाबाबत व कामकाजाच्या अहवालाबाबत धर्मदाय कार्यालयाची पोहोच पावती (सन २०२३-२०२४, २०२४-२०२५, २०२५-२०२६ या तीन वर्षाची)
४. मतदार यादीतील नावाच्या पानाचा कारणापुरता उतारा अथवा सत्यप्रत.
५. उमेदवारासाठी शिफारस केलेले सदस्य कोणत्याही राजकीय पक्षाचे पदाधिकारी नाहीत, कोणत्याही सरकारी, निमसरकारी, केंद्र शासन, राज्य शासन, महानगरपालिका किंवा नगरपरिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायत अशा स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सेवेत नाही असे प्रतिज्ञापत्र.
६. भारतीय संविधानातील अनुसूची १२ प्रमाणे महानगरपालिकांची जी कामे दर्शविली आहेत त्या अनुषंगाने संस्थेचे कार्य हे प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रात तीन वर्षापासून सुरू असल्याबाबत व पूर्ण झाल्याबाबतचा कागदोपत्री ग्राह्य पुरावा.
७. संघटना प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रात काम करीत असल्याबाबत कागदोपत्री पुरावा.
८. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने वैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्राच्या सर्व उमेदवारांच्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या कामकाजामध्ये कोणत्याही प्रकारे आर्थिक हितसंबंध उदा. मनपाचे ठेकेदार, लायसेन्ड प्लंबर, आर्किटेक नसल्याबाबत तसेच अशा प्रकारे आर्थिक हितसंबंध आढळून आल्यास अशी व्यक्ती प्रभाग समितीचे सदस्यत्वास पात्र ठरणार नाही याची जाणीव असल्याबाबत संबंधित संस्थेच्या लेटरहेडवर प्रतिज्ञापत्र तत्काळ सादर करणे आवश्यक राहील.
९. प्रभाग समितीवर बिनसरकारी व समाजलक्षी संघटनाचे प्रतिनिधी घेण्यासाठी वैध ठरलेली सर्व नामनिर्देशनपत्रे संबंधित प्रभाग समितीच्या विशेष सभेत निर्वाचित सदस्यांसमोर निवडीसाठी ठेवणेत येतील.
१०. उमेदवारास दोनपेक्षा अधिक मुले असतील तरः परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नागरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९५ (२००० महाराष्ट्र ४३) याच्या प्रारंभाच्या दिनांकास (या खंडात यापुढे ज्याचा निर्देश "अशा प्रारंभाचा दिनांक" असा करण्यात आला आहे.) दोन मुलांपेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती, अशा प्रारंभाच्या दिनांकास तिला असणाऱ्या मुलांच्या संख्येत वाढ होत नाही तोपर्यंत या खंडान्वये निरर्ह ठरणार नाही.

परंतु आणखी असे की, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत, एकाच प्रसूतीमध्ये जन्माला आलेले एक मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या निरर्हतेच्या प्रयोजनाकरिता विचारात घेतली जाणार नाहीत.

स्पष्टीकरण - या खंडाच्या प्रयोजनार्थ
(एक) ज्यावेळी एखाद्या जोडप्याला अशा प्रारंभाच्या दिनांकाला किंवा त्या दिनांकानंतर आणि त्यानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसूतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तरी ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल;
(दोन) "मूल" यामध्ये दत्तक घेतलेले मूल किंवा मुले समावेश होत नाही.

**माहिती पडताळणी.**

महानगरपालिकेच्या सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांना वरीलप्रमाणे कागदपत्रे शंकास्पद वाटल्यास त्यांची तपासणी करण्यासाठी व शंका निरसन करण्यासाठी मूळ कागदपत्रे उपलब्ध करणेविषयी संघटनांना विनंती करता येऊ शकते.

अपूर्ण अथवा खोटी माहिती याबद्दल संबंधित सदस्याचे कोणत्याही वेळेस सदस्यत्व रद्द करण्याबाबत प्रभाग समितीकडे शिफारस करण्याचा सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांना मा. महापालिका आयुक्त यांच्या पूर्व मान्यतेने अधिकार राहील.

सभा कामकाज नियमावलीतील प्रभाग समितीच्या कामकाजाबाबतचे सर्व नियम या प्रतिनिधींना लागू राहतील.

**सही/-**
**आयुक्त**
**नवी मुंबई महानगरपालिका**


# 'एआय'च्या अनपेक्षित वर्तनाबाबत इशारा

## नव्या देखरेख प्रणालीची 'ओपनएआय' कंपनीची घोषणा

वॉशिंग्टन, ता. १७ : कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) सुरक्षिततेबाबत जगभरात चर्चा सुरू असतानाच, या क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या 'ओपनएआय'ने आपल्या विविध मॉडेलच्या सहा 'अनपेक्षित आणि चिंताजनक' वर्तनांचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. या पार्श्वभूमीवर, एआय मॉडेलच्या गैरव्यवस्थेवर लक्ष ठेवण्यासाठी, तपासणीसाठी आणि ते जाहीर करण्यासाठी कंपनीने नवीन आराखडा सादर केला आहे.

'ओपनएआय'ने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या काही महिन्यांतील प्रशिक्षण आणि मूल्यमापनादरम्यान सहा विविध घटना समोर आल्या आहेत. यामध्ये एका अद्याप प्रसिद्ध न झालेल्या संशोधन मॉडेलने स्वतःच्या नोट्समध्ये 'जेलब्रेक'सारख्या सूचना समाविष्ट केल्या होत्या. याद्वारे मॉडेलने स्वतःवरील मर्यादा झुगारून देण्याचा आणि अन्य चॅटबॉट्सना एकत्रित ठेवणाऱ्या भूमिकांपासून मुक्त होण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे या नवीन आराखड्याद्वारे एआय मॉडेलच्या अनधिकृत कृती, इतर मॉडेलशी समन्वय साधणे यांसारख्या बाबींवर नियंत्रण ठेवले जाणार आहे. एआय अधिक प्रगत होत असताना, त्याच्या संशोधनावर व्यापक सहमतीची गरज असल्याचे कंपनीने स्पष्ट केले.

### 'वेग कमी करा'

'ओपनएआय' आणि 'अँथ्रोपिक' यांसारख्या प्रमुख एआय कंपन्यांच्या प्रमुखांनी सुरक्षिततेच्या कारणास्तव या तंत्रज्ञानाचा वेग कमी करण्याचे आवाहन केले आहे. यापूर्वी जुलैमध्ये 'ओपनएआय'च्या एका प्रणालीने 'हगिंग फेस' या स्टार्टअपवर हॅकिंग केल्याची माहिती समोर आली होती. त्याच महिन्यात 'अँथ्रोपिक'नेही त्यांच्या मॉडेलनी चाचणीदरम्यान तीन संस्थांच्या प्रणालीत अनधिकृत प्रवेश केल्याचे मान्य केले होते.

## ह्युवेईची नवी एआय चिप

बीजिंग, ता. १७ (पीटीआय) : चीनची तंत्रज्ञान कंपनी ह्युवेईने एआय क्षेत्रासाठी नव्या चिप आणि संगणकीय तंत्रज्ञानाची घोषणा केली आहे. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अमेरिका आणि चीनमधील तंत्रज्ञान स्पर्धा आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत. ह्युवेईने शांघायमध्ये झालेल्या वार्षिक 'ह्युवेई कनेक्ट' परिषदेत ही माहिती दिली.

ह्युवेईने 'अॅटलस ९६० सुपरपीओडी' हे नवे संगणकीय क्लस्टर सादर केले. एआयची मोठी मॉडेल्स तयार करण्यासाठी लागणारे प्रशिक्षण तसेच तयार झालेल्या एआयकडून प्रश्नांची उत्तरे किंवा निर्णय मिळविण्याची प्रक्रिया म्हणजे 'इन्फरन्स' अधिक वेगाने करण्यासाठी हे तंत्रज्ञान वापरले जाणार आहे.

## ए वन स्टीलचा आयपीओ २३ पासून

मुंबई, ता. १७ : स्टील उत्पादक कंपनी ए वन स्टीलचा आयपीओ २३ सप्टेंबरपासून बाजारात येत आहे. हा इशू ४५० कोटी रुपयांचा असून, त्यातील २५० कोटी रुपये कर्जांच्या परतफेडीसाठी तर उरलेली रक्कम कंपनीच्या सर्वसाधारण उद्दिष्टांसाठी वापरली जाईल, असे कंपनीचे एमडी संदीप कुमार यांनी सांगितले.

कंपनीचे देशात सहा प्रकल्प असून, नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात त्यांना ४,१६७ कोटी रुपये महसूल मिळाला. लार्सन अँड टुब्रो, टाटा हाउसिंग, अशोक बिल्डकॉन अशा बड्या कंपन्या एआय स्टीलचे ग्राहक आहेत. त्यांची वार्षिक उत्पादन क्षमता १७ लाख टन आहे. त्यामुळे लवकरच कंपनीला युरोपीय बाजारपेठही खुली होईल, असे अध्यक्ष संदीप जालान म्हणाले.

# 'एलजीई इंडिया'ला दोन पुरस्कार प्रदान

नवी दिल्ली, ता. १७ : बंगळूर येथे आयोजित २५ व्या आशिया पॅसिफिक एचआरएम काँग्रेस अॅवॉर्ड्समध्ये एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडियाला दोन पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

नेतृत्व विकास, संस्थात्मक क्षमता, कार्यस्थळ संस्कृती, कर्मचारी अनुभव, कर्मचारी कार्यक्षमता प्रोत्साहन आदी क्षेत्रातील उपक्रमांसाठी टॉप ऑर्गनायझेशन कंपनीला विथ इनोव्हेटिव्ह एचआर प्रॅक्टिसेससाठी सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारासोबतच, एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडियाचे चीफ ह्यूमन रिसोर्सेज ऑफिसर (सीएचओ) ज्वा नाम किम यांना त्यांच्या उत्कृष्ट नेतृत्वासाठी मोस्ट इम्पॅक्टफुल एचआर लीडर पुरस्कार देण्यात आला. कंपनीला सलग दोन वर्षे ग्रेट प्लेस टू वर्क म्हणून प्रमाणित करण्यात आले असून, वर्ल्ड एचआरडी काँग्रेसकडून नॅशनल बेस्ट एम्प्लॉयर ब्रँड पुरस्कारदेखील मिळाला आहे.



पुरस्कार स्वीकारताना ज्वा नाम किम.

## कोटक निफ्टी कॅपिटल मार्केट्स इंडेक्स फंड

मुंबई, ता. १७ : कोटक महिंद्रा अॅसेट मॅनेजमेंट कंपनी लि.ने 'कोटक निफ्टी कॅपिटल मार्केट्स इंडेक्स फंड' ही नवी म्युच्युअल फंड योजना आणली आहे. हा फंड 'निफ्टी कॅपिटल मार्केट्स इंडेक्स' या आधारभूत निर्देशांकनुसार वाटचाल करेल.

नवीन फंड ऑफर २९ सप्टेंबरला बंद होणार आहे. कोटक महिंद्र अॅसेट मॅनेजमेंट कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक (एमडी) नीलेश शाह याबाबत म्हणाले, "जसजशी घरगुती बचत वाढत्या प्रमाणात आर्थिक मालमत्तेकडे वळत आहे, तसतसे शेअर बाजार, फंड व्यवस्थापक, डिपॉझिटरीज, ब्रोकर्स, वेल्थ मॅनेजर्स आणि इतर मध्यस्थ यांसारख्या व्यवसायांना भांडवली बाजारातील वाढत्या सहभागाचा फायदा होऊ शकतो.

## क्रीडा

# अभिषेकचा शतकी झंझावात

## अफगाणिस्तानचा १२७ धावांनी धुव्वा

नवी दिल्ली, ता. १७ : अभिषेक शर्माचे झंझावाती विक्रमी शतक (३४ चेंडूंमध्ये १०८ धावा), संजू सॅमसनची अर्धशतकी खेळी (५० धावा) व नितीशकुमार रेड्डी (३/२५), रवी बिश्नोई (३/२६) व अक्षर पटेल (२/९) यांच्या प्रभावी गोलंदाजीच्या जोरावर भारतीय क्रिकेट संघाने गुरुवारी झालेल्या अखेरच्या टी-२० लढतीत अफगाणिस्तानचा १२७ धावांनी धुव्वा उडवला आणि ३-० असे निर्भेळ यश संपादन केले.

भारताकडून मिळालेल्या २२२ धावांचा पाठलाग करणाऱ्या अफगाणिस्तानचा डाव १४.१ षटकांत ९४ धावांमध्येच आटोपला. इब्राहिम झादरान याने सर्वाधिक २५ धावा केल्या. नितीशकुमार रेड्डी व रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी तीन फलंदाज बाद केले. दोघांनी या मालिकेत छान प्रदर्शन केले, हे विशेष.

अभिषेक शर्मा व संजू सॅमसन या फॉर्ममध्ये असलेल्या सलामी जोडीने ९.४ षटकांमध्ये १४२ धावांची आक्रमक भागीदारी रचली. संजू सॅमसन याने ३५ चेंडूंमध्ये ५० धावांची खेळी साकारली. अभिषेक शर्मा याने आपली झंझावाती फलंदाजी कायम ठेवताना अवघ्या ३४ चेंडूंमध्ये नऊ चौकार व ११ षटकारांचा पाऊस पाडला. कसोटी खेळत असलेल्या देशांचा विचार करता ही विक्रमी शतकी खेळी ठरली.

# भारताकडे इतिहास रचण्याची संधी

## डेव्हिस टेनिस करंडक : कोरियाविरुद्ध लढत

सोल, ता. १७ : भारत-कोरिया यांच्यामध्ये उद्यापासून (ता. १८) डेव्हिस टेनिस करंडक क्वालिफायर टू ही लढत रंगणार आहे. पहिल्या दिवशी एकेरीच्या दोन लढती खेळवण्यात येणार आहेत. दक्षिणेश्वर सुरेश-सूनवू क्वोन यांच्यामध्ये पहिली लढत होणार असून, सुमीत नागल-हेऑन चुंग यांच्यामध्ये दुसरी लढत रंगणार आहे. या दोन्ही लढतींवर विशेष लक्ष असणार आहे. भारताला डेव्हिस करंडकाच्या अंतिम आठ संघांमध्ये स्थान मिळवण्याची ऐतिहासिक संधी आहे.

दक्षिणेश्वर सुरेशने फेब्रुवारीमध्ये झालेल्या नेदरलँड्सविरुद्धच्या लढतीत भारताच्या ३-२ विजयात शानदार कामगिरी केली होती. तो सहभागी झालेल्या तीनही सामन्यांत भारताने विजय मिळवला होता. सध्या तो जागतिक क्रमवारीत ३६७व्या स्थानावर आहे. दुसरीकडे सूनवू क्वोन सध्या १५०व्या क्रमांकावर आहे. २०२१ मध्ये तो कारकिर्दीतील सर्वोत्तम ५२व्या क्रमांकावर पोहोचला होता. त्याने यावर्षी तीन चॅलेंजर स्पर्धा जिंकल्या आहेत. लष्करी सेवा पूर्ण केल्यानंतर जुलैमध्ये त्याने पुन्हा टेनिसमध्ये पुनरागमन केले. मागील फेरीत अर्जेंटिनाविरुद्ध दक्षिण कोरियाने ३-२ असा विजय मिळवला, त्यात सूनवू क्वोनने दोन्ही एकेरी सामने जिंकले.


## जॉन कॉकरिल इंडिया लिमिटेड

John Cockerill

नोंदणीकृत कार्यालय : युनिट क्र. १९०२, १९ वा मजला, ऑरम क्यू २ आयटी पार्क, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, ठाणे बेलापूर मार्ग, नवी मुंबई -४०० ७१०. दूरध्वनी क्र.: + ९१ ९६१९७६२७२७
ई-मेल : investors.jcil@johncockerill.com
वेबसाइट : www.johncockerillindia.com
सीआयएन : L99999MH1986PLC039921

**सूचना**

**कंपनीच्या शेअर्सचे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधीकडे हस्तांतरण**

ही सूचना कंपनी कायदा, २०१३ ('सदर कायदा') च्या कलम १२४ च्या तरतुदींनुसार आणि त्यासह वाचन केलेल्या गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (Investor Education and Protection Fund Authority)(लेखांकन, लेखापरीक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियम, २०१६ आणि त्यामध्ये आजपर्यंत सुधारित केल्यानुसार (यापुढे "सदर नियम" म्हणून संबोधले जाईल) प्रकाशित करण्यात येत आहे.

उक्त कायदा आणि नियमांमध्ये, इतर बाबींबरोबरच, असे सर्व शेअर्स ज्यांच्या लाभधारक मालकाने गेल्या सात वर्षांत कोणताही लाभांश वॉरंट वटवलेला नाही, असे शेअर्स गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरणाच्या ("IEPF") डिमॅट खात्यात हस्तांतरित हस्तांतरण करण्याची तरतूद आहे.

त्यानुसार, सदर कंपनीने उक्त नियमांनुसार ज्या भागधारकांचे (शेअर होल्डर्स) शेअर्स आयईपीएफच्या (IEPF) डिमॅट खात्यात (DEMAT Account) हस्तांतरित होण्यास पात्र आहेत, त्यांना योग्य ती कारवाई करण्यासाठी त्यांच्या कंपनीकडील नवीनतम उपलब्ध पत्त्यावर एक विशिष्ट पत्र (specific communication) आधीच पाठवले आहे.

कंपनीने अशा भागधारकांचा आणि आयईपीएफच्या डिमॅट खात्यात हस्तांतरित होणाऱ्या शेअर्सचा संपूर्ण तपशील तिच्या **https://johncockerillindia.com** या वेबसाइटवर अपलोड केला आहे. भागधारकांना विनंती आहे की, त्यांनी न वटवलेल्या लाभांशांचा तपशील (un-encashed dividends) आणि आयईपीएफच्या डिमॅट खात्यात हस्तांतरित होणाऱ्या शेअर्सची पडताळणी करण्यासाठी कंपनीच्या वेबसाइटला भेट द्यावी.

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १२४(६) आणि नियमांनुसार, कंपनी असे सर्व शेअर्स, ज्यांच्या लाभधारक मालकाने मागील सात वर्षांत (म्हणजेच आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि त्यानंतर) कोणतेही लाभांश वॉरंट वटवलेले नाही, असे शेअर्स आयईपीएफच्या डिमॅट खात्यात हस्तांतरित करणार आहे.

ज्या भागधारकांच्या नावे भौतिक स्वरूपात नोंदणीकृत असलेले असे शेअर्स (shares in physical form) आहेत, त्यांची नोंदणी आपोआप रद्द होईल आणि ते हस्तांतरणीय नाहीत (non-negotiable) असे मानले जाईल. भागधारकांनी हेदेखील लक्षात घ्यावे की, उक्त नियमांनुसार आयईपीएफच्या डिमॅट खात्यात शेअर्स हस्तांतरित करण्याच्या उद्देशाने कंपनीद्वारे डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्र जारी करण्याच्या संदर्भात, कंपनीने आपल्या वेबसाइटवर अपलोड केलेला तपशील हीच पुरेशी सूचना मानली जाईल. डिमॅट स्वरूपात असलेल्या शेअर्सच्या बाबतीत, नियमांनुसार आयईपीएफच्या डिमॅट खात्यात शेअर्स हस्तांतरित करण्यासाठी कंपनीद्वारे आवश्यक कॉर्पोरेट कार्यवाही सुरू केली जाईल.

संबंधित भागधारकांनी नोंद घ्यावी की, अशा हस्तांतरणानंतर, ते आयईपीएफकडून लाभांशासह सदर शेअर्सवर दावा करू शकतात, ज्यासाठी नियमांनुसार विहित केलेल्या फॉर्म IEPF-5 मध्ये आयईपीएफकडे स्वतंत्र अर्ज करावा लागेल आणि सदर फॉर्म **www.iepf.gov.in** या आयईपीएफच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

जर कंपनीला २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत किंवा अशा अन्य वाढीव तारखेपर्यंत संबंधित भागधारकांकडून कोणतेही पत्र (communication) प्राप्त झाले नाही, तर कंपनी, नियमांमध्ये नमूद केलेल्या आवश्यकतांचे पालन करण्याच्या दृष्टीने, नियमांमध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार देय तारखेपर्यंत आयईपीएफच्या डिमॅट खात्यात शेअर्स हस्तांतरित करेल.

वरील बाबीसंदर्भात कोणत्याही प्रश्नांसाठी, संबंधित भागधारकांनी कंपनीशी संपर्क साधावा किंवा बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट यांच्याशी कार्यालय क्र. एस६-२, सहावा मजला, पिनॅकल बिझनेस पार्क, अहुरा सेंटर पुढे, महाकाली केव्हज रोड, अंधेरी पूर्व, मुंबई – ४०००९३, महाराष्ट्र, भारत येथे संपर्क साधावा. दूरध्वनी क्रमांक: +91 22 62638200 / 62638300 | फॅक्स क्रमांक: +91 22 62638299 | ईमेल: **investor@bigshareonline.com** | वेबसाइट: **www.bigshareonline.com**

सदर सूचनेची (नोटीसची) प्रत कंपनीच्या **https://johncockerillindia.com** या वेबसाईटवर आणि बीएसई लिमिटेडच्या वेबसाईटवर देखील उपलब्ध आहे.

मंडळाच्या आदेशानुसार
**जॉन कॉकरिल इंडिया लिमिटेड यांच्यासाठी**
**सही/-**
**निधी सलामपुरिया**
**(Nidhi Salampuria)**
**कंपनी सचिव**
**FCS:10448**

**दिनांक: १७ सप्टेंबर, २०२६**
**ठिकाण : नवी मुंबई**